# अधिसुचना

## 3 x 660 मे.वॅ. कोराडी प्रकल्प बाधीत गावातील उमेदवारांना सामाजिक उत्तरदायित्व योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थी म्हणून निवड

म.रा.वीज निर्मिती कंपनीच्या 3 x 660 मे.वॅ प्रकल्पबाधीत गावातील आय.टी.आय. धारक उमेदवारां करीता **सामाजिक उत्तरदायित्व** योजने अंतर्गत प्रशिक्षण योजना राबविण्यात येत असून त्या अंतर्गत प्रशिक्षणार्थी म्हणून पात्र उमेदवारांकडून ऑन लाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑन लाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना कोराडी प्रशिक्षण केंद्राच्या **www.ktcmahagenco.com** संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी **अर्जदाराने** संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

<u>सदर सुचने अंतर्गत अर्ज करण्या--या उमेदवाराने प्रामुख्याने खालील अर्हता पूर्ण करणे आवश्यक आहे</u>. :-

1. उमेदवार हा प्रकल्पग्रस्त परिवारातील असावा, किंवा केंद्रिय वन व पर्यावरण विभागाने नमूद केलेल्या प्रकल्प बाधीत ( 3 x 660 मे.वॅ. कोराडी) क्षेत्रफळातील असावा किंवा प्रकल्पग्रस्त परिवारातील नसल्यास त्या गावठाणांतील परिवारापैकी असावा.
2. **<u>उमेदवार हा सदर योजने अंतंगत समाविष्ठ यादीमधील गावचा मुळ रहीवासी असावा. कोराडी, पांजरा, नांदा, महादुला, लोणखैरी, खापा, बाभुळखेडी, गुमथी, बोखारा, सुरादेवी, वारेगाव, कवठा, म्हसाळा, खसारा, खैरी.</u>**
3. उमेदवार हा माध्यमीक शालांत परिक्षा आणी शासन मान्यताप्राप्त आय.टी.आय. उत्तिर्ण असावा.
4. **३१.०१.२०१९** ला उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४४ वर्षापेक्षा जास्त नसावे.

<u>आवश्यक अर्हता</u>

१. उमेदवार हा संबंधित शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी.आय) कोर्स उर्त्तीण / राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, यांनी संबंधित व्यवसायासाठी दिलेले राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण उर्त्तीण (NCTVT) / (MSCVT), सदर पदासाठी खालील व्यवसाय (ट्रेड) विहीत करण्यात आले आहेत. १) इलेक्ट्रीशियन (वीजतंत्री) २) वायरमन (तारतंत्री) ३) मशिनिस्ट (यंत्र कारागीर) ४) फिटर (जोडारी) ५) इलेक्ट्रॉनिक्स / इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक / इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी अँन्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेटेनन्स ६) इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन सिस्टीम ७) वेल्डर (संधाता) ८) इन्स्ट्रयुमेंट मेकॅनिक ९) ऑपरेटर कम मेकॅनिक पोल्युशन कंट्रोल इक्वीपमेंट १०) बॉयलर अटेंडन्स ११) स्विच बोर्ड अटेंडन्स १२) स्टिम टर्बाईन ऑक्झीलरी प्लॅन्ट ऑपरेटर / स्टिम टर्बाईन ऑपरेटर १३) ऑपरेटर कम मेकॅनिक मटेरीयल हॅडलींग इक्वीपमेंट १४) ऑपरेटर कम मेकॅनिक (पावर प्लॅन्ट ) या शासनमान्य आय.टीआय. / (NCTVT) / (MSCVT) उर्त्तीण असणा-या उमेदवारांनी अर्ज करावेत.

**<u>प्रशिक्षणाकरीता ऑन लाईन अर्ज सादर करणे करिता तारिख वेळ व पद्धती</u>**

**उमेदवाराने अधीसुचनेच्या अधीन राहुन सर्व आवश्यक पुर्वावश्यक्यता पुर्ण करीत असल्याची खात्रीकरुन कोराडी प्रशिक्षण केंद्र येथे व्यक्तिशाह: मूळ रहिवासी प्रमाणपत्रासह उपस्थित राहुन ऑन लाईन अर्ज सादर करावा.**

**<u>१. अर्ज सादर करण्याची मुदत ०१.०२.२०१९ (सकाळी १०.३० नंतर) ते ०८.०२.२०१९ (दुपारी ४.०० वाजेपर्यंत) राहील.</u>**

**<u>२. उपरोप्त कालावधी मध्ये सार्वजनिक सुट्टी दुसरा चौथा शनिवार तसेच रविवार वगळता इतर दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० व २.३० ते ४.०० या वेळेत अर्ज सादर करण्याकरीता उपस्थित राहावे.</u>**

**<u>३. ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता उपस्थित राहताना उमेदवाराने खालील नमुद कागद पत्रांचा सॉफ्ट कॉपी तसेच छायांकित प्रति व दोन रंगीत पासपोर्ट साईझ फोटो आवश्यक राहतील.</u>**

| **कागद पत्र** | **सॉफ्ट कॉपी करीता आवश्यक** Size & Format |
|---|---|
| **पासपोर्ट साईझ फोटो** | 20KB – 50KB ( jpg/jpeg/png/gif/bmp/pdf) |
| **स्वहस्ताक्षर** (Signature) **फोटो** | 10KB – 20KB ( jpg/jpeg/png/gif/bmp/pdf) |
| Residential proof form concern GramSevak/SarPunch/Talathi | 300KB **पर्यंत** ( jpg/jpeg/png/gif/bmp/pdf) |
| SSC - Marksheet | 300KB **पर्यंत** ( jpg/jpeg/png/gif/bmp/pdf) |
| ITI from Govt. Recognised Institute - Marksheet | 300KB **पर्यंत** ( jpg/jpeg/png/gif/bmp/pdf) |
| Proof of Age - SSC Certificate/ **जन्मदाखला** | 300KB **पर्यंत** ( jpg/jpeg/png/gif/bmp/pdf) |
| Proof of Address - Aadhar Card/ Domicile Certificate | 300KB **पर्यंत** ( jpg/jpeg/png/gif/bmp/pdf) |
| Proof of Identity - Pan Card/Driving Licences/Aadhar card | 300KB **पर्यंत** ( jpg/jpeg/png/gif/bmp/pdf) |

<u>निवड प्रक्रिया</u> :-

१. उमेदवारांची गुणवत्ता यादी ही त्यांनी माध्यमिक शालांत परिक्षेत (SSC) मिळविलेल्या गुणांच्या आधारे लावण्यात येईल.

२. अर्हता प्राप्त उमेदवारांपैकी माध्यमिक शालांत परिक्षेचे गुण समान असल्यास आय.टी.आय च्या गुणाक्रमानुसार व त्यात देखील समानता असल्यास वयाच्या जेष्ठतेनुसार प्राथम्यक्रम यादी तयार करण्यात येईल.

## प्रशिक्षण कालावधी :-

प्रशिक्षणाचा कालावधी ५ वर्षाचा राहिल. मात्र प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षाणार्थीचे वय ४५ वर्ष पूर्ण झाल्यास किंवा ५ वर्षाचा प्रशिक्षण कालावधी यापैकी जो कालावधी अगोदर पूर्ण होईल त्यानुसार प्रशिक्षण संपुष्टात येईल.प्रशिक्षण कालावधीनंतर सदर उमेदवारांना कंपनीच्या सेवेत सामावून घेण्याचे कोणतेही बंधन महानिर्मिती कंपनीवर राहणार नाही.

## प्रशिक्षण कालावधीत मिळणारे मानधन :-

| | | |
|---|---|---|
| पहिले वर्ष | — | रुपये 6000/— |
| दुसरे वर्ष | — | रुपये 6500/— |
| तिसरे वर्ष | — | रुपये 7000/— |
| चौथे वर्ष | — | रुपये 7500/— |
| पाचवे वर्ष | — | रुपये 8000/— |

## अटी व शर्ती :-

1. ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची अंतीम तारीख **०८.०२.२०१९** दुपारी ४.०० पर्यंत राहील. ऑनलाईन ( Online) अर्ज आणि पूर्वावश्यकता पूर्ण करीत असल्याबाबतचे आवश्यक दस्ताऐवज उमेदवाराने त्याच्या कडेच सांभाळून ठेवणे आवश्यक आहे. सदर तारखेनंतर ऑनलाईन अर्ज करता येणार नाही. तसेच पात्र उमेदवारांना दस्ताऐवज तपासणीसाठी बोलविले असल्यास नेमूण दिलेल्या तारखेला अर्ज व सर्व आवश्यक दस्ताऐवज यांची झेरॉक्स व मुळ प्रति सह हजर राहणे आवश्यक राहील.
2. ही प्रशिक्षण योजना सामाजिक उत्तरदायित्व योजनेअंतर्गत कौशल्य विकास या कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असून महानिर्मिती कंपनीच्या सेवेत कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क कोणत्याही प्रशिक्षणार्थीना करता येणार नाही.
3. या योजनेतंर्गत प्रशिक्षणार्थी ५ वर्षे प्रशिक्षण पुर्ण न करता सोडून गेल्यास त्याच्या जागेवर दुस-या उमेदवाराला प्रशिक्षणार्थी म्हणून संधी मिळणार नाही.
4. प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण काळात मिळणा—या मानधना व्यतिरीक्त कोणताही भत्ता देय होणार नाही.
5. प्रशिक्षणार्थीची कमाल संख्या ही १३५ एवढी राहील. त्यापेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी रुजू करुन घेता येणार नाही.

6. प्रशिक्षणाचा कालावधी ५ वर्षाचा असून, ५ वर्ष पूर्ण होताच **किंवा प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थिंचे वय ४५ वर्षे पुर्ण होताच यापैकी जे** कालावधी **अगोदर पूर्ण होईल त्या तारखेला** त्या प्रशिक्षणार्थीची प्रशिक्षण योजना आपोआप संपुष्टात येईल. त्या करीता वेगळा कार्यमुक्तीचा आदेश काढण्याची गरज नाही. ते आपोआप कार्यमुक्त झाले असे समजण्यात येईल व ५ वर्षानंतर शेवटच्या दिवशी **किंवा प्रशिक्षणादरम्यान वयाची ४५ वर्ष पूर्ण झाल्यानंतर** संबंधित अधिकारी त्यांना प्रशिक्षण पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र हस्तांतरीत करतील.

7. प्रशिक्षणार्थीना बायोमॅट्रीक पध्दतीने हजेरी नोंदवावी लागेल व दररोज ८ तास प्रशिक्षण पुर्ण करणे गरजेचे आहे. उपस्थितीच्या हजेरीनुसार उपस्थित दिवसांवर प्रशिक्षण मानधन अदा करण्यात येईल.

8. प्रशिक्षणार्थीना एका वर्षात १५ वैद्यकीय रजा व साप्ताहिक एक सुट्टी मिळेल.

9. प्रशिक्षणार्थीना कोणत्याही प्रकारचा निवासी गाळा उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

10. प्रशिक्षणार्थीची निवड ही गुणतत्तेच्या आधारावर केल्यानंतर संबंधित उमेदवार ठरवुन दिलेल्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे हजर होतील व त्या विभाग प्रमुखांमार्फत त्यांच्या प्रशिक्षणाचे मुल्यमापन करण्यात येईल. मुल्यमापनानंतर दरवर्षी ५ प्रमाणे गुण देण्यात येतील. कमाल गुणाची मर्यादा २५ राहिल. सदर गुण महानिर्मिती कंपनी सरळसेवेची तंत्रज्ञ 3 पदाची जाहिरात येईल त्यावेळेस विचारात घेण्यात येतील.

11. आय.टी.आय प्रमाणपत्र किंवा चारित्र्य पडताळणी अंती कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळल्यास पुर्व सुचना न देता प्रशिक्षण बंद करण्यात येईल.

12. हे प्रशिक्षण ऐच्छिक असुन महानिर्मिती कंपनीमध्ये कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत कोणतीही हमी देत नाही. सोबत बंधपत्र नमुना जोडला आहे. तो १०० रु. च्या बंधपत्रावर नोटरी करुन प्रशिक्षणाकरिता रुजु होण्यापुर्वी सादर करावा.

13. जे उमेदवार प्रशिक्षण कालावधीत १ महीन्यापेक्षा अधिक गैरहजर राहतील त्यांचे प्रशिक्षण ताबडतोब बंद करण्यात येईल.

14. साप्ताहीक सुट्टी व १५ वैद्यकीय रजा वगळून प्रत्येक वर्षी एकुण हजेरीच्या ७५% हजेरी आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी हजेरी असल्यास पुढील प्रशिक्षणासाठी संबंधित प्रशिक्षणार्थास अपात्र ठरविण्यात येईल व प्रशिक्षण बंद करण्यात येईल.

15. प्रशिक्षण कालावधीत कंपनीच्या नियमांचे / शिस्तीचे पालन करणे प्रशिक्षणार्थीवर बंधनकारक राहील. कंपनीच्या नियमाचा व शिस्तीचा भंग करणा-या प्रशिक्षणर्थीना पुर्व सूचना न देता काढुन टाकण्यात येईल व सदर प्रशिक्षणार्थीला परत संधी मिळणार नाही.

16. प्रशिक्षणार्थीना कंपनीत प्रशिक्षण कालावधीत सुरक्षा विषयक नियमांचे पालन करतांना हेल्मेट, गमबुट तसेच अँप्रोन स्वखर्चाने खरेदी करावे लागेल त्यासाठी कंपनी कोणत्याही प्रकारे अनुदान देणार नाही.

17. प्रशिक्षणार्थीना कंपनीत प्रशिक्षण प्रशिक्षणार्थीना दरम्यान देय अपघात विमा करीता हप्ता साधारण रु. १००/- प्रशिक्षाणार्थ्यांना देय वेतनातून कपात करण्यात येईल किंवा आवश्याक असल्यास त्याची पुर्तता संबंधित विभागाकडे रोखीने करावी लागेल.

18. प्रशिक्षणार्थीना तीन पाळीमध्ये प्रशिक्षण देण्यात येईल. ज्या पाळीमध्ये प्रशिक्षणार्थीना काम देण्यात येईल त्या पाळीमध्ये प्रशिक्षणार्थीना काम करणे बंधनकारक राहील.

19. प्रशिक्षणार्थी महीलांना रात्रपाळीत काम दिले जाणार नाही.

20. प्रशिक्षणार्थीना कोणत्याही संघटनेचे सदस्य होता येणार नाही किंवा संघटना स्थापना करता येणार नाही.

21. प्रशिक्षणार्थीना न्यायालयात प्रशिक्षणाच्या अनुषंगाने कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

22. अपंग उमेदवारांमध्ये एक पाय बाधित व कर्णबाधिर या प्रवर्गातीलच उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. इतर अपंग प्रवर्गातील उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहणार नाहीत.

23. दस्ताऐवज सादर करण्यात दिलेल्या कालावधीमध्ये उमेदवाराने दस्ताऐवज सादर न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**दस्ताऐवज तपासणीसाठी बोलाविण्यात येणा-या उमेदवाराने अर्जाबरोबर सादर करावयाचे आवश्यक दस्ताऐवज -**

१. अर्ज

२. ज्या गावठाणातील मुळ रहीवासी असल्याचे अर्जात नमुद आहे त्या गावठाणातील संबंधीत ग्रामसेवक, सरपंच किंवा तलाठी यांच्या कडून निगमित मुळ रहिवासाचा दाखला

३. माध्यमिक शाळा परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र

४. आय.टी.आय उत्तीर्ण असल्याचा दाखला (शासन मान्य संस्थेचे)

५. माध्यमिक शाळा (SSC Leaving Certificate) सोडल्याचा दाखला / जन्म दाखला

६. महाराष्ट्र शासनाचे अधिवासाचे प्रमाणपत्र

७. ओळखपत्र (पॅन कार्ड / ड्रायव्हिंग लायसेंस / आधारकार्ड )

८. सादर प्रक्रिये दरम्यान उमेदवारांनी त्यांचा मोबाईल क्रमांक तसेच त्यांचा ई-मेल आय डी सुरु ठेवावे तसेच सादर प्रक्रियेचा अद्यावत माहितीसाठी उमेदवारांनी **www.ktcmahagenco.com** संकेत स्थळ पाहत राहावे.

Sd/-

**मुख्य अभियंता (प्रशि.)**
**कोराडी प्रशिक्षण केंद्र, महाजेनको, कोराडी**